# ८८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, घुमान (पंजाब) २०१५

## गाळा धारकांसाठी नियमावली

१) आपल्या गाळ्यांवर ३ खुर्च्या, २ टेबल्स्, २ ट्युब्स्, १ डस्टबिन बॉक्स या गोष्टी संयोजकांतर्फे दिल्या जातील.

२) गाळ्याचा आकार १०' १२' इतका असेल. इलेक्ट्रिकचा एक पॉईंट देण्यात येईल.

३) आपल्या गाळ्यामध्ये सुरक्षेच्या दृष्टीकोनातून ४ माणसांसाठी आपल्याला ओळखपत्र घ्यावे लागेल. हे ओळखपत्र दि. २ एप्रिल २०१५ रोजी सकाळी ११ वाजल्यापासून संमेलनस्थळी मिळेल. ह्या ओळखपत्रासाठी प्रत्येकाकडे स्वत:ची ओळख पटविण्याचा काही पुरावा असणे आवश्यक आहे. स्वत:चे दोन फोटो असणे आवश्यक आहे. तसेच गाळ्यामध्ये असणाऱ्या माणसांनी ओळखपत्र परिधान करणे अनिवार्य आहे. यापैकी एकाची न्याहारी, चहा, भोजन व निवासाची व्यवस्था करण्यात येईल. अन्य ओळखपत्रधारकांची निवास, न्याहरी व भोजन व्यवस्था प्रत्येकी **१५००** रुपये भरून करण्यात येईल. (दि. **३१/०१/१५** पर्यंत रक्कम भरावी.)

४) गाळा ताब्यात घेतेवेळी पैसे भरल्याची मूळ पावती व इतर कागदपत्र सोबत आणावीत.

५) गाळ्यामध्ये अधिक फर्निचर हवे असल्यास त्याचे वेगळे भाडे द्यावे लागेल. गाळ्यातील वस्तू अगर पुस्तके आदींची जबाबदारी आपणावरच राहील.

६) वीजेची अधिक उपकरणे लावल्यास वीजेचे वेगळे पैसे द्यावे लागतील.

७) प्रदर्शन परिसरात अग्निजन्य वस्तू उदा.पेट्रोल, केरोसिनवर चालणारे स्टोव्ह किंवा गॅसवर चालणाऱ्या बत्त्या आणण्यास अथवा कोणत्याही प्रकारचे अन्न शिजवणे, गरम करणे अशा गोष्टी करण्यास संपूर्ण मनाई आहे.

८) प्रदर्शनामध्ये फक्त पुस्तके, ग्रंथव्यवहाराशी संबंधित सी.डी.यांची विक्री करण्यास परवानगी आहे. याशिवाय इतर वस्तू विकू नये.

९) पुस्तकाच्या पॅकिंगसाठी प्लॅस्टिकचा वापर करू नये. पर्यावरणपूर्वक पिशव्या आपण स्वत: आणाव्यात.

१०) एका संस्थेस (फर्म) जास्तीत जास्त चार सलग गाळे मिळतील.

११) गाळ्यात व परिसरात स्वच्छता ठेवावी.

१२) प्रत्येक गाळ्यास रु. ११००/- (रुपये **अकराशे** मात्र) इतकी रक्कम आरक्षण करतेवेळी आगाऊ भरावी लागेल.

१३) संपूर्ण रक्कम भरल्याशिवाय आरक्षण मिळणार नाही.

१४) दि. पासून नोंदणी सुरू होणार आहे. आपला पूर्ण भरलेला अर्ज दि. ३१/१/१५ पर्यंत ———————— व महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे (रविवार व सुट्टीचे दिवस सोडून) या पत्त्यावर पाठवावा.

१५) गाळ्यांची सोडत दि. रोजी सकाळी ११ वाजता महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे येथे काढण्यात येईल. सोडतीवेळी गाळाधारकांनी समक्ष उपस्थित रहावे. सोडतीचा निर्णय सर्वांना बंधनकारक राहील.

१६) आरक्षित केलेला गाळा संयोजकांकडून लेखी परवानगी घेतल्याशिवाय अन्य संस्थेस किंवा व्यक्तीस परस्पर भाडे घेऊन हस्तांतरीत करता येणार नाही.

१७) याबाबत अधिक माहिती हवी असल्यास संपर्क : ७५०७४११९२१

भारत देसडला
स्वागताध्यक्ष
८८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, घुमान (पंजाब) २०१५